



# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक २६, शुक्रवार १३ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लंके परिवार पराभवाने खचणारा नाही!

## राणी लंके यांचे प्रतिपादन । पारनेर येथे विविध उपक्रमांनी शरद पवारांचा वाढदिवस साजरा

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीतील पराभवानंतर मी शरद पवार यांची भेट घेतली. त्यांच्या भेटीनंतर काम करण्यासाठी मला नवी उर्जा मिळाली. विधानसभा निवडणूकीत पराभव झाला असला तरी लंके परिवार हा खचून जाणारा नाही. आमचा जन्म समाजासाठी झालेला आहे. निकालच्या दुसऱ्या दिवसापासून आम्ही कामाला सुरूवात केली. पराभव झाला म्हणून कोणीही खचून जाऊ नका. पराभव मनातून काढून टाका, नव्या उभारीने कामाला सुरूवात करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणी लंके यांनी केले.**

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून ५०० गरजू विद्यार्थ्यांना सायकल वितरण, वृध्दांना काठी वाटप करण्यात आले. तसेच नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मा वाटप मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. दि. ५ जानेवारीपर्यंत हे शिबिर मतदारसंघाच्या विविध गावांमध्ये घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमानिमित्त बोलताना राणी लंके यांनी कार्यकर्त्यांना खचून न जाण्याचा सल्ला दिला.

यावेळी बोलताना राणी लंके म्हणाल्या, शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून दरवर्षी समाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी आगळे वेगळे उपक्रम राबविण्यात येत असल्याने शरद पवार यांचा वाढदिवस नेहमीच स्मरणात रहात असल्याचे राणी लंके यांनी सांगितले. राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंग मापारी यांनी स्वागत केले तर नांदुरपठारचे माजीसरपंच रवींद्र राजदेव यांनी सूत्रसंचालन केले.



■ खा. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून ५०० विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले.

### दातृत्ववान नेतृत्व

गेल्या पंधरा वर्षांपासून खा. नीलेश लंके हे सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी संघर्ष करत आहेत. एक दातृत्ववान नेतृत्व आपल्याला नेतृत्व लाभले आहे. पोटाला चिमटा घेऊन दुसऱ्याला काहीतरी देण्याची त्यांची धडपड असते. त्याच हेतूने त्यांनी सायकल वितरण, मोफत चष्मा वाटप व मोतीबिंदू शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

**बापूसाहेब शिर्के शिर्के**
उपसभापती, बाजार समिती

### कष्टकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. खा. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेरमध्ये आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. केवळ निवडणूका आल्या म्हणून नव्हे तर खा.लंके हे दरवर्षी असे उपक्रम राबवितात. गोरगरीब विद्यार्थांना आर्थिक मदत, सायकल वितरण करण्यात येते. शेतकरी, कष्टकरी यांच्या प्रश्नांची जाण असणारे नेते म्हणून शरद पवार यांची ओळख आहे. मागिल वर्षी आठ हजार विद्यार्थ्यांना सायकलचे वितरण करण्यात आले.

**गंगाराम बेलकर**
मा. सभापती, पंचायत समिती

### तांत्रीक मार्गाने पराभव

राणी लंके यांचा झालेला पराभव तांत्रीक मार्गाने झाला आहे. लोकशाही मार्गाने पराभव झालेला नाही. आपण ईव्हीएमला दोष देत असू तर ईव्हीएमविरोधात देशभर लढा उभारला गेला पाहिजे. ईव्हिएम हटविल्याशिवाय आपल्याला सामान्य लोकांची कामे करता येणार नाहीत.

**संभाजी रोहोकले**
तालुकाध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस

### लंके परिवाराची गोरगरीबांसाठी धडपड

जाती पातीच्या पलीकडे जाउन राजकारण करण्याचा पिंड शरद पवार यांचा असून त्यांनी पुरोगामी महाराष्ट्र घडविण्याचे काम त्यांनी केले. आपले खासदार नीलेश लंके हे शरद पवार यांच्या निकटवतय आहेत. कारण लंके परिवार गोगरीबाची सेवा करण्यासाठी नेहमीच धडपडत असल्याचे अर्जुन भालेकर म्हणाले.

### पवारांचे विविध क्षेत्रात काम

कोणतेही क्षेत्र पहा पवार साहेब यांचे तिथे काम आहे. ८५ वर्षे वय असणारे शरद पवार हे या वयातही महाराष्ट्र पिंजून काढतात. प्रत्येक माणसाचे दुःख ते जाणतात. सहकार, उद्योग, कृषि, दुग्ध, क्रिडा क्षेत्रातील शरद पवार यांचे काम उल्लेखणीय आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आपण काम करतो ही अभिमानाची बाब असल्याचे सुवर्णा धाडगे यांनी सांगितले.

### नि:स्वार्थ भावनेने उपक्रम

२४ तास ३६५ दिवस काम करणारा लंके परिवार आहे. यापूर्वही खा. लंके यांच्याकडून विद्यार्थी, गरजूंना मदत करण्यात आलेली आहे. हे उपक्रम राबविताना कोणताही स्वार्थ न ठेवता निस्वार्थ भावनेने उपक्रम राबवितात. सर्वसामान्य घरात जन्म घेऊनही दातृत्व काय असते हे लंके परिवाराने कृतीतून दाखवून दिले आहे. असे असतानाही हे ओळखण्यात आपण कुठेतरी कमी पडलो याची खंत होते. भविष्यात काहीतरी चांगले घडावे यासाठी असे घडले असेल आणि त्यातून आपणास आनंद मिळेल. चमकणारा हिरा म्हणजे खा. नीलेश लंके हे आहेत.

**सुवर्णा धाडगे**
राष्ट्रवादी महिला आघाडी तालुकाध्यक्ष

### ईव्हीएमने घडवून आणलेला पराभव

मागील महिन्यात आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले. हा आपला पराभव नसून ईव्हीएमने घडवून आणलेला पराभव आहे. गुजरातमधून ईव्हिएम आणण्यात येऊन मोठं मोठया नेत्यांचे खच्चीकरण करण्यात आले. येणारा भविष्यकाळ आपल्यासाठी चांगला असेल. लंके परिवार खचणारा नसून संघर्ष करणार आहे.

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### समाजोपयोगी काम थांबणार नाही

विद्यार्थ्यांना सायकल वाटपाचा कार्यक्रम पहिल्यांदाच ठेवलेला नाही. गेल्या पाच सहा वर्षांमध्ये शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. यंदा सायकल वितरणाबरोबरच डोळयांच्या सर्व विकारांवर मोफत उपचार करण्यात येणार आहेत. चष्मे वाटप करण्यात येणार आहे. निवडणूका डोळयापुढे ठेऊन समाजोपयोगी उपक्रम राबविणे असा खा. नीलेश लंके यांचा पिंड नाही. सत्ता असो वा नसो समाजोपयोगी कामे थांबणार नाही असे राजेंद्र चौधरी यांनी सांगितले.

### सर्वच क्षेत्रात पवार यांचे काम

शरद पवार यांनी चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. देशाचे संरक्षण, कृषि मंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द भारताने पाहिली आहे. शेतकऱ्यांची ७२ हजार कोटी रूपयांची कर्जमाफी त्यांनी केली. सर्वच क्षेत्रात त्यांचे नाव मोठे असल्याचे राजेंद्र चौधरी यांनी सांगितले.

### कुठे कमी पडलो हे तपासा

निवडणूकीतील पराभवाचा या कार्यक्रमात उल्लेख झाला. यश प्रत्येक वेळी मिळतेच असे नाही. पराभवाने खचून न जाता भगवतगितेमध्ये सांगितल्याप्रमाणे आपण आपले काम करत आहोत. पराभवाची कारणे शोधली पाहिजेत. आत्मपरिक्षण केले पाहिजे. एका पराभवाने आपण खचून जाणारे नाहीत. ज्यांच्यावर विश्वास टाकला त्यांनी किती प्रामाणिकपणे काम केले याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. मीच खासदार या भावनेतून आपण वागल्याने हा पराभव ओढावला आहे. विरोधकांना नावे ठेवण्यापेक्षा आपण कुठे कमी पडलो हे तपासणे गरजेचे आहे.

**राजेंद्र चौधरी**, मा. पंचायत समिती सदस्य

### दुप्पट वेगाने काम करायचे आहे

खा. नीलेश लंके यांच्या वतीने दरवर्षी समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात. समाजासाठी आपण काहीतरी दिले पाहिजे या भावनेतून खा. लंके हे काम करत असल्याने त्यांना लोकनेते ही उपाधी मिळाली आहे. समाजाचे ऋण फेडण्याचे काम लंके परिवाराकडून सातत्याने करण्यात येते. आजचा दिवस दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. विधानसभा निवडणूकीत पराभवाला सामोरे जावे लागले असले तरी आपण सर्वजण पुन्हा एकदा मोठया ताकदीने उभे राहिलो आहोत. कोणीही खचून न जाता दुप्पट वेगाने काम करायचे आहे.

**रा.या.औटी**

### नवी भरारी घेऊ

शेतकऱ्यांना ७२ हजार कोटींची कर्जमाफी, महिलांना ५० टक्के आरक्षण, राज्यातील एमआयडीसी, हजारो तरूणांना नोकरीची संधी शरद पवार यांनी उपलब्ध करून दिली. निवडणूकीतील पराभव हा खा. नीलेश लंके हे विसरले आहेत. त्याबाबत मेळाव्यात विचारमंथनही झाले आहे. नवी भरारी घेत २४ तास उपलब्ध राहण्याचा प्रयत्न करू.

**बाबाजी तरटे**, सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती

### ५६३ रूग्णांची नेत्र तपासणी

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त येत्या ५ जानेवारीपर्यंत पारनेर-नगर मतदारसंघात मोफत नेत्रतपासणी, मोतिबिंदू शस्त्रकिया व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले असून त्याचा शुभारंभ गुरूवारी बाभुळवाडे व वडझिरे येथे करण्यात आला. बाभुळवाडे येथे १५३ रूग्णांची तपासणी करण्यात येऊन ११८ रूग्णांना चष्मे वितरण करण्यात आले तर ५ रूग्णांचे मोतीबिंदूंचे निदान झाले असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तर वडझिरे येथे ४५० रूग्णांची नेत्रतपासणी, २८० रूग्णांना चष्मा वितरण करण्यात आले. २२ रूग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर लवकरच शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

## लाडकी बहीण : समाज माध्यमांवरील माहिती दिशाभूल करणारी

### आदिती तटकरेंचे स्पष्टीकरण राज्य सरकारचे पत्रक जारी



मुंबई : प्रतिनिधी

**लाडकी बहीण योजनेच्या निकषांत बदल करण्यात आल्याचे, लाडक्या बहिणींना अपात्र करण्याचे काम सरकारच्यावतीने सुरू असल्याचे मेसेज सोशल मीडियावर फिरत आहेत. याबाबत आता स्वतः महिला व बाल कल्याण विभागाने माहिती दिली आहे.**


लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हफ्ता महिलांना अद्याप मिळालेला नाही, त्यामुळे या योजनेशी निगडीत अनेक बातम्या समाजमाध्यमांवर पसरत आहेत. त्यातच सरकारकडून या योजनेसाठी लाभार्थ्यांची पात्रता नव्याने तपासली जाणार असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. अर्जाची छाननी करून निकषात बसणाऱ्या महिलांच्याच बँक खात्यात मासिक रक्कम जमा होईल. असे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले असताना माजी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी सरकारी पत्रक दाखवत योजनेच्या निकषाबाबत महत्वपूर्ण माहिती दिली आहे.

लाडकी बहीण योजनेच्या निकषांत बदल करण्यात आल्याचे, लाडक्या बहिणींना अपात्र करण्याचे काम सरकारच्यावतीने सुरू असल्याचे मेसेज सध्या सोशल मीडियावर फिरत आहेत. त्यामुळे, लाडक्या बहिणींमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली असून उर्वरीत पान ३ वर

## नगरात बांगलादेशी घुसल्याचा संशय

नगर : प्रतिनिधी

**नगर शहरातील भोसले आखाडा परिसरातील एका धार्मिक स्थळात गुरुवारी (दि.१२) सकाळी संशयीत बांगलादेशी इसम घुसल्याची अफवा पसरली. याबाबत माहिती मिळताच कोतवाली पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सर्व ७ ते ८ संशयितांना ताब्यात घेत पोलिस ठाण्यात आणले. तेथे त्यांची कसून चौकशी केल्यावर ते सर्व भारतीयच असून इज्तेमासाठी मध्यप्रदेशातील भोपाळ येथून नगरला आले असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



याबाबत मिळालेली माहिती अशी की, भोसले आखाडा परिसरात असलेल्या एका धार्मिक स्थळात ७ ते ८ अनोळखी इसम जाताना परिसरातील नागरिकांनी पाहिले. ते नगर शहरातील नसल्याने आणि या पूर्वी त्यांना या ठिकाणी पाहिलेले नसल्याने नागरिकांना ते बांगलादेशी घुसखोर असावेत असा संशय आला. त्यामुळे परीसारतील नागरिक त्या धार्मिक स्थळाजवळ गोळा झाले. काही नागरिकांनी त्यांना तुम्ही कोठून आलात अशी विचारणा केल्यावर आम्ही भोपाळ येथून आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांचा संशय आणखीनच बळावला.

अनेकांनी शहरात इकडे, तिकडे फोनाफोनी सुरु केली. काही नागरिकांनी कोतवाली पोलिसांना फोन करून माहिती दिली. ही माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी गेले. त्यांनी त्या इसमांना ताब्यात घेत चौकशीसाठी पोलिस ठाण्यात आणले. त्यांच्या कडे बराच वेळ चौकशी करण्यात आली त्यांच्याकडील आधार कार्डची तपासणी करून भोपाळ येथे संपर्क साधून माहिती घेण्यात आली. चौकशी अंती ते सर्वजण भारतीयच असल्याचे समोर आल्यावर त्यांच्याकडून त्यांची सर्व माहिती, तसेच ते नगरला कशासाठी आले, किती दिवस राहणार, पुन्हा कधी उर्वरीत पान ३ वर

## मितेश नाहाटा यांना अटक; साखर गैरव्यवहार प्रकरण

### इंदौर पोलिसांकडून कारवाई

श्रीगोंदा : प्रतिनिधी



**राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मितेश नाहाटा यांना साखर गैरव्यवहार प्रकरणात इंदौरच्या पोलिसांनी अटक केले आहे. त्यामुळे मितेश नाहाटाला पदावरून बडतर्फ करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांनी काढले आहे. मितेश बाळासाहेब नाहाटा हा श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथे रहिवासी आहे.**

पुणे येथील एक जणासमवेत मितेश नाहाटा याने इंदौरमधील व्यापाऱ्याला साखर देण्याच्या बदल्यात कोट्यावधीचा गंडा घातल्याची फिर्याद इंदौर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. या प्रकरणी तेथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मितेश नाहाटाला ताब्यात घेतले आहे. ही माहिती मिळताच राष्ट्रवादी युवक काँग्रेसने मितेश नाहाटाला पदावरून बडतर्फ केल्याचे समजते.

या प्रकरणातील फिर्यादीत सांगण्यात आलेला दुसरा आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील एका ज्येष्ठ दिवंगत नेत्याचा मुलगा असल्याची चर्चा आहे. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यात मोठा राजकीय भूकंप झाल्याचे समजते. इंदौर पोलिसांच्या कारवाईच्या उर्वरीत पान ३ वर



# चंदेरी

## हे आहेत २०२४ मधील सर्वोत्तम भयपट

- 'मुंज्या', 'स्त्री २' आणि 'भूल भुलैया ३' असे अनेक भयपट यंदा प्रदर्शित झाले. या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. काही भयपट तर ओटीटीवरही सुपरहिट ठरले. तुम्हाला भयपट पाहायला आवडत असतील, तर २०२४ मधील काही गाजलेले चित्रपट तुम्ही घरबसल्या पाहू शकता. या यादीत सोनाक्षी सिन्हाचा 'काकुडा' ते तमन्ना भाटियाच्या 'अरनमनई ४'चा समावेश आहे.
- काकुडा : 'काकुडा' चित्रपट या वर्षी जुलैमध्ये झी ५ वर प्रदर्शित झाला होता. हा एक हॉरर कॉमेडी चित्रपट आहे, ज्यात सोनाक्षी सिन्हा, रितेश देशमुख यांच्यासह अनेक स्टार्स होते. एका गावात 'काकुडा' नावाच्या भूताची भीती असते. दर मंगळवारी रात्री ८ वाजता 'काकुडा' भूत येते, असे या चित्रपटात दाखवण्यात आले आहे.
- अरनमनई ४ : 'अरनमनई ४' हा २०२४ मध्ये आलेला तमिळ भाषेतील हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. याचे दिग्दर्शन सुंदर सी. यांनी केले होते. या चित्रपटात तमन्ना भाटिया, राशी खन्ना, संतोष प्रताप, रामचंद्र राजू, कोवई सरला, योगी बाबू यांच्यासह अनेक कलाकार आहेत. हा चित्रपट अरनमनई या चित्रपटाचा चौथा भाग आहे. हा चित्रपट खूप गाजला होता. चित्रपटाने चांगली कमाई केली होती. तुम्ही जिओ सिनेमावर हा चित्रपट पाहू शकता.
- ब्लडी इश्क : 'ब्लडी इश्क' हा चित्रपटही याच वर्षी हॉटस्टारवर रिलीज झाला होता. यात अविका गौर मुख्य भूमिकेत होती. हा चित्रपट एका महिलेभोवती फिरतो जी तिच्या नवीन घरात अलौकिक गोष्टी अनुभवते. लोकांना हा हॉरर चित्रपट खूप आवडला होता. हा तुम्ही घसबसल्या पाहू शकता.
- टॅरो : 'टॅरो' ही सात मित्रांची कथा आहे. या सातपैकी हेली आणि ग्रँट या दोघांचे ब्रेकअप होते. त्यानंतर बाकीचे मित्र सगळ्यांचे मूड चांगले व्हावे यासाठी ॲलिसच्या वाढदिवसाची पार्टी करतात. तिथे ते टॅरो कार्ड वाचतात. त्यानंतर चित्रपटात जे घडतं, ते पाहून तुम्ही हादरून जाल. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे.

# सर्वात लोकप्रिय भारतीय सेलिब्रिटी



आयएमडीबीने २०२४ मधील लोकप्रिय भारतीय कलाकारांची यादी जाहीर केली आहे. चित्रपट, टीव्ही आणि सेलिब्रिटींच्या माहितीच्या आधारे ही यादी तयार केली जाते. आता सर्वाधिक लोकप्रिय टॉप १० कलाकारांची यादी घोषित केली आहे. IMDb वरील दर महिन्याच्या २५ कोटींहून जास्त प्रेक्षकांच्या खऱ्या पेज व्ह्यूजनुसार ही क्रमवारी ठरवण्यात आली आहे. यंदा या यादीत तृप्ती डिमरी पहिल्या क्रमांकावर आहे. यावर्षी तिचे 'बॅड न्यूज', 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' आणि 'भूल भुलैया ३' हे चित्रपट आले. या तिन्ही चित्रपटातील तिच्या अभिनयाने जगभरातील चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. २०२४ मधील सर्वात लोकप्रिय भारतीय कलाकारांच्या IMDb यादीमध्ये दिग्गज व उदयोन्मुख प्रतिभावान कलाकारांचा समावेश आहे, यातून भारतीय मनोरंजन जगताचे वैविध्यपूर्ण प्रतिबिंब दिसते, असं IMDb इंडियाच्या प्रमुख यामिनी पतोडिया म्हणाल्या. आमच्या वार्षिक यादीमध्ये जागतिक प्रेक्षकांच्या बदलत्या चॉईसची झलक दिसते. शाहरूख खान आणि ऐश्वर्या राय बच्चन असे दिग्गज कलाकार आजही प्रेक्षकांना कसे आकर्षित करतात, हे दिसून येतं. दुसरीकडे तृप्ती डिमरी आणि शर्वरी हे नवीन कलाकार प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहेत.

### टॉप १० लोकप्रिय कलाकार

- १. तृप्ती डिमरी
- २. दीपिका पादुकोण
- ३. इशान खट्टर
- ४. शाहरूख खान
- ५. सोभिता धुलिपाला
- ६. शर्वरी
- ७. ऐश्वर्या राय बच्चन
- ८. समांथा रूथ प्रभू
- ९. आलिया भट्ट
- १०. प्रभास

" २०२४ च्या IMDb सर्वाधिक लोकप्रिय भारतीय कलाकारांच्या यादीमध्ये पहिला क्रमांक मिळणे, हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. माझ्या चाहत्यांचे आभार. ही माझ्या कठोर परिश्रमाची पावती आहे. मी वर्षभरात अनेक चांगल्या प्रोजेक्ट्समध्ये काम केलं. हे वर्ष माझ्यासाठी खूपच संस्मरणीय राहिलं.




# मनोज वाजपेयी अन् रामगोपाल वर्मा पुन्हा एकत्र येणार

अभिनेता मनोज वाजपेयी यांनी आजवर कायम वेगळी आणि परिघाबाहेर विचार करणारी पात्रे साकारली आहेत. 'गँग ऑफ वासेपूर', 'दाऊद', 'सत्या', 'तमन्ना', 'सरकार ३' असे एकापेक्षा एक थ्रिलर आणि मनोरंजनासाठी पैसा वसूल ठरणारे चित्रपट त्यांनी सिनेसृष्टीला दिले आहेत. १९९८ साली मनोज वाजपेयी यांचा 'सत्या' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने त्यावेळी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली होती. प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली होती. त्यात मनोज वाजपेयी यांनी भिकू म्हात्रे हे पात्र साकारले होते. या चित्रपटानंतर मनोज वाजपेयी घराघरात पोहोचले. आता मनोज वाजपेयी पुन्हा एकदा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्याबरोबर काम करणार आहेत. त्यांनी स्वतः एका मुलाखतीमध्ये याबाबतची घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले, की प्रेक्षक आणि चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. राम गोपाल वर्मा त्यांचा पुढचा चित्रपट माझ्याबरोबर बनवणार आहेत. फक्त त्यासाठी आम्हाला थोडा वेळ द्यावा लागणार आहे. त्यानंतर आम्ही या चित्रपटाच्या तारखांवर बोलणार आहोत. तारखा ठरल्यानंतर लगेचच चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. राम गोपाल वर्मा यांच्या सत्या या चित्रपटाने मनोज वाजपेयी यांच्या चित्रपट प्रवासाला एक वेगळे वळण दिले. त्यानंतर या दोघांनी 'शूल', 'रोड' व 'सरकार ३' या चित्रपटांमध्येही एकत्र काम केले. हे सर्वच चित्रपट फार गाजले आणि प्रेक्षकांनी या चित्रपटांवर भरभरून प्रेम केले. अशात मनोज वाजपेयी यांनी आणखी एका चित्रपटाची घोषणा केल्याने चाहत्यांच्या मनात याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता लागली आहे. मुलाखतीमध्ये त्यांना भिकू म्हात्रे पात्राबद्दल आणखी विचारण्यात आले. आता त्यांना हे पात्र करायचे असेल, तर त्यांनी यात आणखी काही वेगळेपण आणले असते का, या प्रश्नाला उत्तर देताना मनोज वाजपेयी यांनी म्हटले, जेव्हा मी हे पात्र साकारलं तेव्हा माझ्यात एक वेगळी ऊर्जा होती. आता ती ऊर्जा राहिलेली नाही. रस्त्यानं चालतानासुद्धा माझी हाडे वाजतात आणि एखादी उडी मारावी लागली, तर मी स्वतःची फार काळजी घेतो. प्रत्येक वयाचं त्या त्या वेळचं एक वेगळं सौंदर्य असतं, असे मनोज वाजपेयी म्हणाले. दरम्यान, मनोज वाजपेयी लवकरच त्यांच्या 'डिस्पॅच' या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्यामध्ये मनोज एका पत्रकाराच्या भूमिकेत रुपेरी पडद्यावर झळकणार आहेत.

# प्रेमभंग झाल्यावर शाहिद रडायचा...

**'इश्क विश्क' या चित्रपटातून २००३ साली बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारा अभिनेता म्हणजे शाहिद कपूर होय. शाहिद कपूरने 'विवाह', 'जब वी मेट', 'फटा पोस्टर निकला हिरो', 'रंगून', 'कबीर सिंग' अशा अनेक चित्रपटांत काम केले आहे. त्याच्या अभिनयाबरोबरच अभिनेता त्याच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत राहिला. मात्र, शाहिद कपूर त्याच्या खासगी आयुष्यावर बोलणे टाळतो. आता मात्र एका मुलाखतीत अभिनेत्याने प्रेमभंग झाल्यानंतर तो सेटवर रडायचा असे वक्तव्य केले आहे. त्याच्या या वक्तव्याची चर्चा होताना दिसत आहे.**

शाहिद कपूरने नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याला विचारण्यात आले की, त्याच्या करिअरमुळे तो कधी खोलीत एकटाच बसून रडला आहे का? यावर बोलताना त्याने म्हटले, माझा प्रेमभंग झाला होता, त्यावेळी मी खोलीत बसून एकटाच रडत असे. तो काळ वाईट होता. माझे मेकअप आर्टिस्ट म्हणत असायचे की, मी आताच मेकअप केला आहे, तू रडणे थांबवू शकत नाहीस का? आणि मी त्यांना म्हणत असायचो की मी काही करू शकत नाही. मला वाटते की मी स्वतःला उद्ध्वस्त करून घेत आहे. मी माझ्या प्रेमभंगामुळे रडलो आहे, कामामुळे कधीच नाही, असे शाहिद कपूरने म्हटले आहे. शाहिद कपूरने पुढे बोलताना पुरुषांनी आयुष्यात एक गोष्ट बदलायला हवी यावर भर देत म्हटले, विशेषतः भारतीय पुरुषांनी काही गोष्टी बदलायला हव्यात. खूप लहान वयातच त्यांना हे सांगितले जाते की तुम्हाला इतरांना गोष्टी द्यायच्या आहेत, तुम्हाला संरक्षण करायचे आणि घरचा कर्ता पुरुष व्हायचे आहे. ज्या गोष्टी आवडतात, त्याचे संरक्षण करण्यासाठी पुरुष नेहमीच काळजीत असतात. कधी कधी यामुळे त्यांच्यावर मोठा दबाव निर्माण होतो. काही वेळा फक्त त्यांना आराम करायचा असतो आणि वाटत असते की, मला प्रत्येक गोष्टीची व माणसांची प्रत्येक वेळी काळजी करायची नाही. मलाही कधीतरी असुरक्षितता वाटू शकते आणि त्यावेळी इतर कोणीतरी माझे संरक्षण केले पाहिजे. आपण आपल्या भूमिका, जबाबदाऱ्या का बदलत नाही? असुरक्षिततेसारखी भावना जाणवणे चुकीचे नाही, कारण शेवटी आपण सगळे माणसं आहोत, असेही शाहिद म्हणाला.



# अल्लू अर्जुनला लेकीची येतेय आठवण..!

**अनेक दिवसांपासून अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदानाच्या 'पुष्पा २ : द रुल' या चित्रपटाची प्रेक्षक वाट पाहत होते. हा बहुप्रतीक्षित चित्रपट ५ डिसेंबर रोजी चित्रपटगृहांत धडकला. पहिल्या भागापेक्षा सिक्वेल सुमार असल्याची टीका होत असली तरी बऱ्यापैकी गल्ला या चित्रपटाने पहिल्या काही दिवसांतच जमवला आहे. सध्या अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदाना चित्रपटाच्या प्रमोशनमुळे विविध ठिकाणी ते भेट देत आहेत, मुलाखती देत आहेत**



अल्लू अर्जुनने एका कार्यक्रमात त्याच्या मुलीची त्याला किती आठवण येत होती, याबद्दल सांगितले. बाप आणि लेकीचं नातं सर्वांत खास आणि वेगळं असतं. मुलीबद्दल सांगताना अल्लू अर्जुन म्हणाला, की गेल्या तीन ते चार वर्षांत मी मुलीला जवळ घेतलेलं नाही, तिला किस केलेलं नाही. कारण माझी दाढी फार जास्त वाढलेली आहे आणि मी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त होतो. आता लवकरात लवकर हे सर्व संपवून मला मुलीला जवळ घ्यायचं आहे. शूटिंग संपल्यावर त्याच्या आणि रश्मिकाच्या भावना काय होत्या हेसुद्धा त्यानं सांगितलं आहे. तो म्हणाला, की रश्मिकाचं शूटिंग माझ्या एक दिवस आधी संपलं होतं. ती माझ्यासमोर आली आणि तिच्या डोळ्यांत अश्रू आले. मी तिला म्हणालो की, काय झालं तू का रडत आहेस? त्यावर ती म्हणाली, सर, माझ्या आयुष्यातील जवळपास पाच वर्षे मी या चित्रपटांसाठी काम करतेय. त्यामुळे ही संपूर्ण टीम आणि येथील व्यक्ती मला माझ्या कुटुंबाप्रमाणे वाटत आहेत. त्यावर मी तिला सांगितलं की, हो आम्हालापण तुझी फार आठवण येईल आणि मी अगदी साध्या पद्धतीनं तिला म्हटलं, की ठीक आहे आपल्याला आयुष्यात पुढे जावं लागेल. रश्मिकाला हे सर्व सांगताना मी स्वतः अगदी नॉर्मल होतो. मला विशेष असं काही वाटत नव्हतं. मात्र, दुसऱ्या दिवशी माझं शूटिंग संपलं आणि मी अगदी शांत झालो. माझ्यासाठी येथून जाणं फार कठीण झालं. कारण पाच वर्षांपासून आम्ही त्याच चेहऱ्यांना रोज पाहत होतो, त्याच व्यक्तींबरोबर वेळ घालवत होतो, असे अल्लू अर्जुन म्हणाला.

# त्या काळात विवेक ओबेरॉयने काय सहन केलं, सर्व सांगितले

**बॉलीवूडच्या कलाकारांची अनेकदा विविध कारणांमुळे चर्चा होताना दिसते. आता बॉलीवूड अभिनेता विवेक ओबेरॉय हा एका मुलाखतीत केलेल्या वक्तव्यांमुळे चर्चेत आला आहे.**

विवेक ओबेरॉयने म्हटले, की माझ्या करिअरमध्ये मी असा एक संघर्षाचा काळ अनुभवला, ज्यावेळी मला आर्थिक ताण सहन करावा लागला. मी खूप तणावात होतो. मला अंडरवर्ल्डमधून धमक्यांचे फोन यायचे. मी माझ्या आयुष्यात असे कधी अनुभवले नव्हते. हे सगळे एकत्र घडले. सलमान खानबरोबर त्याने जे भांडण सुरू केले होते, त्यावर बोलताना विवेकने म्हटले, की तो एक भावनिक प्रतिसाद होता. मी खूप लहान होतो. माझ्या कृत्यांचे परिणाम मला खूप उशिरा समजले. मी केलेल्या गोष्टींच्या परिणामांना सामोरे जाण्यास मी तयार होतो. पण, ज्यावेळी माझ्या आई- वडिलांना धमकावले गेले, त्यावेळी मला त्रास झाला. माझे आई- वडील फोन उचलायचे तेव्हा त्यांना धमकावले जायचे. मला माझ्या बहिणींसाठी भीती वाटत होती. सुरुवातीला आम्ही विचार केला की, हे फ्रँक कॉल आहेत. पण, नंतर पोलिसांकडून समजले की, त्या धमक्या खऱ्या होत्या, असे विवेकने सांगितले. विवेकला काय धमकी मिळाली होती, याबद्दल त्याने कोणतेही वक्तव्य केले नाही. याबद्दल अधिक बोलताना त्याने 'मी माझ्या रिलेशनशिपच्या कठीण टप्प्यातून गेलो' असे सांगितले.



# मल्लिका शेरावतचं ब्रेकअप!

**मलायका अरोरा व अर्जुन कपूर यांचं काही दिवसांपूर्वी ब्रेकअप झालं. दोघांनीही ते सध्या सिंगल असल्याचं म्हटलंय. त्यानंतर आता अभिनेत्री मल्लिका शेरावतनेही ब्रेकअप झाल्याची माहिती दिली आहे. ४८ वर्षीय मल्लिकाचं फ्रेंच बॉयफ्रेंडबरोबरचं नातं तुटलं आहे. मल्लिका घटस्फोटित आहे. तिने २००० मध्ये करण सिंग गिलशी लग्न केलं होतं, मात्र वर्षभरातच तिचा घटस्फोट झाला होता.**

मल्लिका शेरावत व तिचा फ्रेंच बॉयफ्रेंड सिरिल ऑक्सेनफन्सबरोबर यांचं ब्रेकअप झालं आहे. दोघेही गेल्या अनेक वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते, मात्र आता त्यांचं नातं संपुष्टात आलं आहे. मल्लिकाने तिच्या ब्रेकअपबाबत जास्त बोलण्यास नकार दिला आहे. मल्लिकाने सांगितलं की सध्या ती तिच्या अधिक चांगल्या व मनोरंजक भूमिकांच्या शोधात आहे. तसेच ती वैयक्तिक आयुष्यात योग्य व्यक्तीचा शोध घेत आहे. आजच्या काळात योग्य जोडीदार मिळणं खूप कठीण आहे, असं म्हणत मल्लिकाने ती सिंगल असल्याचं स्पष्ट केलं.

## लग्नाबद्दल मल्लिकाने मांडलं मत

मल्लिका शेरावतला विचारण्यात आलं की ती सिंगल आहे का? तेव्हा अभिनेत्रीने होकार दिला. मी सिंगल आहे, असं ती म्हणाली. मल्लिका फ्रेंच नागरिक सिरिल ऑक्सेनफन्सला डेट करत होती. त्याचा उल्लेख केल्यावर ती म्हणाली, आमचं ब्रेकअप झालं आहे. मला याबद्दल बोलायचं नाही. मल्लिकाने यावेळी लग्नाबाबत आपलं मत मांडलं. मी याच्या बाजूने नाही आणि विरोधातही नाही. दोन लोकांना काय हवं आहे यावर ते अवलंबून आहे, असं मल्लिका म्हणाली.

## चांगला जोडीदार मिळणं कठीण

एखादी व्यक्ती जर आपला वेळ आणि भावना गुंतवत असेल तर तो जोडीदार त्याच्यासाठी पात्र असला पाहिजे, असं मल्लिकाला वाटतं. इतकी वर्षे झाली, मी अजूनही वाट पाहत आहे. कदाचित मी खूप अपेक्षा करत आहे, असं मल्लिका म्हणाली. मल्लिका शेरावतच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास ती शेवटची 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' या चित्रपटात दिसली होती. राजकुमार राव व तृप्ती डिमरी यात मुख्य भूमिकेत होते.

## शॉर्ट न्यूज

### स्नेहालयात रंगली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा

**नगर :** एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस ॲण्ड वैदिक मॅथस असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सकाळच्या सत्रात घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठमोठी गणिते झटपटपणे सोडवित अवघ्या ५ मिनीटाच्या आतमध्ये आपला पेपर सोडवित उपस्थितांना अवाक केले. ही स्पर्धा ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेवल १ ते ५ व वैदिक मॅथ्स या गटात घेण्यात आली.

### घोरपडवाडीचे लोकनियुक्त सरपंच अपात्र

**राहुरी :** तालुक्यातील घोरपडवाडी ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच मैनाबापू रावसाहेब शेंडगे यांचे पद अपात्र करण्याचे आदेश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले आहेत. शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश पारित केले आहेत. घोरपडवाडी ग्रामपंचायतची पंचवार्षिक निवडणूक डिसेंबर २०२३ मध्ये झाली होती. यावेळी लोकनियुक्त सरपंच मैनाबापू शेडगे यांनी माजी सरपंच सयाजी श्रीराम यांचा ३५ मतांनी पराभव केला होता.

### शेवगावात ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम

**शेवगाव :** ईव्हीएम हटाव, देश बचाव, या वंचित बहुजन आघाडीच्या स्वाक्षरी अभियानास शेवगाव शहरात उस्फुर्तपणे प्रतिसाद मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व मतदार संघात ईव्हीएम विरोधात मतदार स्वाक्षरी मोहीम दि. ३ ते १६ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने काल शेवगाव येथे शहर व तालुक्यातील अनेक मतदारांनी ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीमेत सहभाग घेतला.

### तिसगावमध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले

**पाथर्डी :** तालुक्यातील एक मोठी व्यापारी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तिसगाव येथे गेल्या काही दिवसापासून चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी गाई बैल म्हशी यासह अनेक शेती उपयुक्त साहित्य चोरीला जात असून या चोरांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे तिसगाव मधील सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात असून पोलिसांनी या चोरट्यांचा शोध घेवुन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी तिसगावच्या ग्रामस्थांनी पाथर्डी पोलिसांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

### अमोल खताळ यांना मंत्रीपदाची संधी मिळणार

**संगमनेर :** महाविकास आघाडीच्या पराभवाचे कारण अतिआत्मविश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी अमोल खताळ आणि राधाकृष्ण विखे पाटील यांना मंत्रीपदाची संधी मिळण्याबाबतही आपले विचार मांडले. त्यांनी विरोधकांवर निशाणा साधत काँग्रेस नेत्यांवरही टीका केली. सुजय विखे पाटील यांना यावेळी अमोल खताळ यांना मंत्रीपदाची संधी मिळेल का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर सुजय विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. ‘‘संधी मिळण्याची अपेक्षा प्रत्येकाला आहे. अमोलला मिळाली तर त्यात दु: ख वाटायचं काही कारण नाही.

# तळेगावच्या १०३ शेतकऱ्यांना नोटीसा,अन्याय होऊ देणार नाही

## भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन



**अहमदपूर : प्रतिनिधी**

**अहमदपूर तालुक्यातील तळेगाव येथील शेतकऱ्यांना जुलै व ऑगस्ट महिन्यात जमिनीच्या मालकी हक्काचा दावा करणाऱ्या नोटिसा आल्या होत्या. तळेगावातील १०३ शेतकऱ्यांना आलेल्या नोटीस मुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याने भितीयुक्त वातावरणात वावरताना दिसून येत आहे. नोटीस आलेल्या काही शेतकऱ्यांनी या नोटीस वक्फ बोर्डाकडून आल्या असल्याचे निवेदनात म्हटल्यामुळे लातूर जिल्ह्यासह महाराष्ट्रात खळबळ उडाली.**

अनेक माध्यमावरून या बातम्या प्रकाशित झाल्यानंतर वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी यांनी या नोटीस वक्फ बोर्डाकडून आल्या नसल्याचे स्पष्ट केले होते. तळेगाव येथे भारतीय जनता पक्षाचे लातूर जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी तळेगाव गावात जाऊन नोटीस मिळालेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला.

शेतकऱ्यांनी या प्रकरणातील सर्व घटनाक्रम दिलीपराव देशमुख यांना सांगितला असता, देशमुख यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिलासा देत ‘‘घाबरून जाऊ नका कायदेशीर लढा उभारून तज्ञ वकिलामार्फत या प्रकरणात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही शेतकऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असे आश्वासन दिले. त्याचबरोबर या प्रकरणात जर कोणी पैशाची मागणी केली, तर कृपया कोणालाही पैसे देऊ नका, असे सांगितले. सर्व शेतकऱ्यांनी आपल्याकडील सर्व पुरावे कोर्टाकडे सादर करून या जमिनी आमच्या मालकीच्या आहेत हे सिद्ध करून ज्यांनी या जमिनीवर दावा केला आहे. तो खोडून टाकता येईल, असे दिलीपराव देशमुख यांनी सांगितले.

# सामाजिक बहिष्कार, जादूटोणाविरोधी कायद्याची निर्मिती हे तर अंनिसचे यश - संजय बनसोडे

## आळंदीत २७ डिसेंबरपासून अंनिसचे अधिवेशन



**कुकाणे : प्रतिपादन**

**अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही समाजातील अनेक घटकांचा सहभाग असलेली, लोकाधारावर चालवली जाणारी चळवळ आहे. जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा या दोन कायद्यांची निर्मिती हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सामाजिक यश असल्याचे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३५व्या वर्षपूर्तीनिमित्त संविधान जागर राष्ट्रीय परिषद व महाराष्ट्र अंनिसचे ३५ वर्षपूर्ती राज्य अधिवेशन २७ ते २९ डिसेंबरदरम्यान आळंदी येथे होत आहे. त्याच्या नियोजनाकरिता सौंदाळे (ता. नेवासे) येथे समितीचे राज्य निमंत्रक कॉ. बाबा आरगडे यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांची बैठक झाली. त्यावेळी मार्गदर्शन करताना बनसोडे बोलत होते. राज्य सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे, प्राचार्य अशोक गवांदे, समितीचे नेवासे तालुकाध्यक्ष कॉ. आप्पासाहेब वाबळे, कारभारी गरड, सुखदेव फुलारी, बाळासाहेब आरगडे, भाऊसाहेब सावंत, डॉ. संतोष फुलारी, इंजिनिअर नयन फुलारी, कॉम्रेड भारत आरगडे, देविदास पऱ्हाड, रेणुका चौधरी आदी या वेळी उपस्थित होते.

बनसोडे म्हणाले, की अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीला ३५ वर्षे पूर्ण होत आहे. संविधानिक मूल्यांसाठी, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवाद समाजात रुजवण्यासाठी अंनिस काम करीत आहे. काही सामाजिक बदल संघटनेच्या कामातही झाले आहेत. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन समितीचे कार्य सुरू आहे. राज्यभरात ३६ जिल्ह्यांमध्ये ३५० हून अधिक समितीच्या शाखा असून, ५ हजारांहून अधिक सक्रिय कार्यकर्ते आहेत. साधे, सत्यशोधकी, नोंदणी पद्धतीने आंतरजातीय व आंतरधर्मीय २ हजारांपेक्षा जास्त विवाह समितीने लावले आहेत. जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा कर्नाटक व इतर राज्यात कायदा करण्यासाठी समितीने मदत केली. तसेच युगांडा (द. आफ्रिका) देशात नरबळीविरोधी कायदा करण्यासाठी ही समितीने मार्गदर्शन केले आहे.

**संमेलनात महिलांचा सहभाग वाढावा**

गवांदे राज्य सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे म्हणाल्या, की अंनिसचे हे राज्य अधिवेशन म्हणजे समविचारी लोकांचा आनंद मिळावा असणार आहे. संविधानावर विद्वानांचे विचार ऐकायला मिळणार आहे. अधिवेशनासाठी येणारा प्रत्येक कार्यकर्ता नवीन ऊर्जा घेऊन जाणार आहे. या संमेलनासाठी महिलांचाही सहभाग वाढवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# महाराष्ट्रात इतर राज्यापेक्षा वीज महाग

## जयंत पाटील यांची ट्वीटवर माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्यातील अवाढव्य वीज दरावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. इतर राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्र राज्यात सध्या वीज महाग मिळत असल्याचं ट्वीट करत आताच्या सरकारकडे प्रचंड बहुमत आहे. त्यामुळे वीजदर कमी करण्यात आता कोणतीही अडचण नसावी,असा टोलाही त्यांनी लगावला आहे.**

वीज बिलात ३०% कपात करणार,पाच वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज देणार असे म्हणणारे आज प्रचंड बहुमताने सत्तेत बसले आहेत. सध्या राज्यात असलेले अवाढव्य वीजदर कमी करण्यात आता सरकारला कोणतीही अडचण नसावी,असं म्हणत त्यांनी हे ट्वीट केलंय.

विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर ईव्हीएम हॅकिंगसह अनेक मुद्द्यांवरून महाविकास आघाडी सरकारला घेरताना दिसत आहे. दरम्यान, राज्याची उपराजधानी नागपुरात येत्या १६ ते २१ डिसेंबर रोजी हिवाळी अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनात वाढत्या वीजेचा मुद्दा विरोधक रेटतील अशी चर्चा आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ३०% कपात सोडाच पण इतर राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्रात सध्या वीज महाग मिळत आहे.राजस्थानमध्ये प्रति युनिटला ७. ५५ ते ८.९५ रुपये मोजावे लागत आहेत, तर मध्य प्रदेशमध्ये ३.३४ ते ६.८० रुपये मोजावे लागत आहेत. शेजारच्या कर्नाटक राज्यात तर सरसकट प्रति युनिट ५.९० रुपये आहेत. सर्वात जास्त वीजदर म्हणजे प्रति युनिट ५. १६ ते १७.७९ रुपये महाराष्ट्रात मोजावे लागत आहेत.

# माझ्या प्रकृतीबाबत अफवा पसरवली जात आहे



**पुणे : प्रतिनिधी**

**माझी तब्येत खालावली असल्याची अफवा पसरवली जात असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले आहे. तसेच माझी तब्येत उत्तम असून मइ पूर्ण कार्यक्षमतेने काम करत आहे. वरिष्ठ देतील ती जबाबदारी स्वीकारायला मी तयार आहे, असे म्हणत त्यांनी मंत्रिपदासाठी देखील इच्छुक असल्याचे सूचित केले असल्याचे दिसते.**

एका वृत्तवाहिनीशी बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले, माझ्या प्रकृतीबद्दल अफवा पसरवली जात आहे. माझी तब्येत उत्तम आहे. मइ पूर्ण कार्यक्षमतेने काम करत आहे. वरिष्ठ देतील ती जबाबदारी स्वीकारायला तयार आहे. मला कोणते पद द्यायचे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरवतील.

परभणी येथे झालेल्या हिंसचारावर बोलताना दिलीप वळसे पाटील म्हणाले, परभणीतील तणावाबाबत मला फारशी कल्पना नाही. मात्र, राजकारणासाठी कोणीही असे चुकीचे प्रकार करू नयेत. संयम बाळगून शांतता राखावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच शरद पवार यांच्यावर वक्तव्य करणाऱ्यांनी सुसंस्कृतपणा राखावा, असा सल्ला देखील त्यांनी महायुतीच्या नेत्यांना दिला आहे.

दिलीप वळसेंच्या एका डावामुळे देवदत्त निकमांचा विजय हुलकावणीला गेला होता. वळसेंनी देवदत्त जयवंतराव निकमांच्या विरोधात देवदत्त शिवाजी निकमांना अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरवले होते. विशेष म्हणजे, शरद पवार समर्थक देवदत्त निकमांचे चिन्ह होते तुतारी वाजवणारा माणूस, तर अपक्ष देवदत्त निकमांचे चिन्ह होते ट्रॅपेट. उल्लेखनीय म्हणजे, लोकसभा निवडणुकांमध्ये ट्रॅपेट हे चिन्ह तुतारी या नावाने ओळखले जायचे. वळसेंनी याच साम्याचा फायदा उठवत ही रणनीती आखली, जी त्यांच्या विजयाचा आधार ठरली.

# परभणीतील घटनेचा नगरमध्ये निषेध

## आरोपींना अटक करण्याची मागणी

**नगर : प्रतिनिधी**

**परभणी शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची एका अज्ञाताने मंगळवारी सायंकाळी तोडफोड करून विटंबना केल्यामुळे समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने निषेध नोंदवून मार्केटयार्ड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निदर्शन करण्यात आली.**



यावेळी आंबेडकरी समाजाचे ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, सुनील साळवे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, महेश भोसले आदीसह आंबेडकर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परभणी येथे घडलेल्या घटनेचा सर्व आंबेडकरी समाजाच्या वतीने व पक्ष संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. बांगलादेशातील बौद्ध भिक्षु यांच्यावरील हल्ल्याचे देखील निषेध करण्यात आले. परभणी येथे घडलेल्या घटनेतील आरोपीला तात्काळ अटक करून देशद्रोहचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

(पान १ वरून)

## लाडकी बहीण : समाज माध्यमांवरील माहिती दिशाभूल करणारी

याबाबत स्वतः महिला व बाल कल्याण विभागाने स्पष्टीकरण दिले आहे.

माजी मंत्री व विद्यमान आमदार अदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत स्पष्टीकरण दिले आहे. तटकरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही, अशी माहिती राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडून पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून याबाबतीत मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाज माध्यमांतून होणाऱ्या चुकीच्या माहितीस कोणीही बळी पडू नये, असे आवाहन तटकरे यांनी केले आहे.

## नगरात बांगलादेशी घुसल्याचा संशय

परत जाणार ही माहिती लिहून घेतल्यावर त्यांना सोडून देण्यात आले असल्याचे कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.

## मितेश नाहाटा यांना अटक; साखर गैरव्यवहार प्रकरण

बातम्या सध्या श्रीगोंदा तालुक्यात सोशल मीडियावरून फिरत आहेत. बाळासाहेब नाहाटा हे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे निकटवर्तीय समजले जातात. त्यांच्या मुलाला आर्थिक गैरव्यवहारात ताब्यात घेण्यात आल्याने जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

# निघोज गावचा सरकारवाडा

आमच्या निघोज गावच्या मध्यवर्ती ठिकाणी ग्रामपंचायतीच्या समोरच हा वाडा होता. वाडा रस्त्यापासून किती तरी उंचावर होता. या दोहोंमधून पूर्व पश्चिम, मागील बाजूने पूर्व पश्चिम आणि पश्चिमेला उत्तर दक्षिण असे रस्ते होते. आजही आहेत. भक्कम दगडी बांधकाम असलेला, आणि ऐसपैस असा हा वाडा होता. पुढच्या बाजूस तसाच मागील बाजूसही एक दरवाजा होता. लाकडाचे खांबही होते. लाकडाच्या तुळ्या होत्या. प्रवेशद्वाराच्या भिंतीला गजाच्या कांबी आणि लाकडी फळ्यांच्या मोठाल्या खिडक्या होत्या. प्रथमतः दिवाणखाना लागे. वाड्यात मध्यभागी आंघोळीला बसण्यासाठी खास चौकोनी घोटीव दगडही होता. आंघोळीचे पाणी बाहेर वाहून जाण्यासाठी व्यवस्थाही होती. मागील अर्ध्या बाजूस छत नव्हते. दगडी ओटे होते. तळघरही होते. या वाड्यात काही कागदपत्रेही असल्याचे आठवते. अशी ही इमारत सरकारवाडा म्हणून गावात प्रसिद्ध होती. या वाड्याने कितीतरी उन्हाळे आणि पावसाळे पाहिले असतील. गावकऱ्यांच्या काही पिढ्या आलेल्या आणि गेलेल्या पाहिल्या असतील.

या वाड्याच्या दिवाणखान्यात आमच्या हायस्कूलचा एक वर्ग भरत असे. आमच्या गावचे ग्रामदैवत मळगंगा देवी. तिच्या यात्रेच्या काळात पोलिस बंदोबस्त आवश्यक असे. त्यावेळी याच दिवाणखान्यात पोलिस खात्याच्या कर्मचारी आणि अधिकारी वर्गाची राहण्याची व्यवस्था असे. त्या वाड्याच्या पुढील ओट्यावर शाळा स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताकदिन साजरे करीत.



ग्रामपंचायत आणि वाड्याच्या मधील रस्त्यावर गावातील लग्नाच्या वरातीत लेझमाचे डाव रंगत असत. अशा अविस्मरणीय घटनांचा तो वाडा साक्षीदार होता. आता तो वाडा पडलेला नव्हे; पाडलेला आहे. आता त्या जागी दुकाने आणि कार्यालये थाटलेली आहेत. पण आता तेथे वाडाच नसल्यामुळे पूर्वीचा रुबाब, दबदबा, शानशौकत आणि खानदानीपणा असा त्या वास्तूचा लौकिक नष्ट झालेला आहे. गावातील वाडा संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी ती वास्तू आता अस्तंगत झाली आहे. सरकारवाड्याची आठवण येताच माझे मन भावविभोर होते!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# दुर्गडी किल्ल्याबाबतच्या निर्णयाचे स्वागत

## शिवदुर्ग प्रतिष्ठाणकडून आनंद व्यक्त

सुपा : प्रतिनिधी

**कल्याण येथील दुर्गडी किल्ल्यावरील मुस्लिम समाजाने केलेला दावा न्यायालयाने फेटाळला असून न्यायालयाच्या या निर्णयाचे शिवदुर्ग प्रतिष्ठाणच्या वतीने स्वागत करण्यात येऊन प्रतिष्ठाणच्या सदस्यांनी या निर्णयानंतर आनंद व्यक्त केला.**

शिवदुर्ग प्रतिष्ठाणच्या वतीने प्रसिध्दीस देण्यात आलेल्या पत्रकात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्रातील गड, किल्ले हे छत्रपती शिवरायांची स्मारके म्हणून महाराष्ट्राचे वैभव आहे. छत्रपतींच्या निधनानंतर मोगल शासकांनी अनेक किल्ल्यांची तसेच त्यावरील मंदीर व देव-देवताच्या मंदिरांची मोडतोड करून तिथे मशिदी, मदारी उभारल्या तर अनेक किल्ल्यांचे नामकरणही करण्यात आले. आजही अनेक राज्यातील किल्ल्यांवर मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झाली आहेत. एकीकडे किल्ल्याचे संवर्धन करताना पुरातन खाते एक दगडही उचलू देत नाही, तिथे उंच उंच मशिदी कशा तयार होतात हा प्रश्न शिवप्रेमींना पडत आहे. याच वादातून काही दिवसांपूव विशालगड घटनेचा उद्रेक झाला होता. याची आठवण या पत्रकात करून देण्यात आली आहे.

प्रतिष्ठाणचे अध्यक्ष सुरेंद्र शिंदे, भाऊसाहेब गवळी, नवनाथ साबळे, सुभाष मानकर, वसंत सुरवशे, ठाकुरदास परदेशी, संजय साबळे, संतोष अडसरे, परमेश्वर भवर, गजानन लोंढे, कालिदास भोगाडे आदींनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले.



कल्याण येथील दुर्गडी किल्ल्यावरील दावा न्यायालयाने फेटाळल्यानंतर शिवदुर्ग प्रतिष्ठाणच्या वतीने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

### दावा मुदतबाह्य

सरकारी वकील सचिन देशपांडे यांनी सांगितले की, न्यायालयात दाखल दावा मुदतबाहय असल्याने न्यायालयाने तो फेटाळला. या जागेची मालकी शासनाची असल्याने सन १९६६ मध्ये जागेचा ताबा घेण्यात आला होता. त्यानंतर १९७६ सालामध्ये काही संघटनांकडून या जागेवर दावा करण्यात आला होता. मात्र मुदतीत दावा दाखल न केल्याने तो फेटाळण्यात आला. त्यामुळे या जागेवर शासनाची मालकी आहे हे सिध्द होते.

### ४८ वर्षानंतर निर्णय

कल्याण येथील दुर्गडी किल्ल्याबाबत कल्याण न्यायालयाचा निकाल तब्बल ४८ वर्षांनी देण्यात आला आहे. मात्र या किल्ल्यावर मशिद की मंदीर आहे असा कोणताही निर्णय न्यायालयाने दिला नसला तरी ही जागा शासनाची असल्याचा निर्णय मात्र न्यायालयाने दिला असून आहे. अशाच निर्णयांची देशातील अनेक किल्ल्यांना प्रतिक्षा आहे.

### किल्ला परिसरात बंदोबस्त

न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर किल्ला परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या निर्णयानंतर शिवसेना शिंदे गट तसेच हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी किल्ल्यावर जाऊन आरती केली.

# बांगलादेशातील अत्याचाराचा मुस्लीम बांधवांकडून निषेध

## तहसिलदार गायत्री सैंदाणे यांना निवेदन

पारनेर : प्रतिनिधी

**बांगलादेशामध्ये हिंदू बांधवांवर होत असलेल्या अत्याचाराचा पारनेर तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी निषेध केला असून तसे निवेदन पारनेरच्या तहसिलदार गायत्री सैंदाणे यांना सादर करण्यात आले.**



तहसिलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, तालुक्यातील समस्त मुस्लिम बांधव बांगलादेशमध्ये अल्पसंख्यांक हिंदू बांधवांवर होणा-या अत्याचाराच्या घटनांचा जाहिरपणे निषेध करत आहेत. इस्लाम धर्म हा शांती, सदभावना व शांतीप्रिय असून त्यात अन्याय अत्याचाराला कोठेही थारा नाही. प्रेषित मुहंमद यांनी म्हटले आहे की, अल्लाह ने एक दुस-यांचे प्राण घेण्यास, संपत्ती लुटण्यास आणि आब्रूचे नुकसान करण्यास अवैध व महापाप ठरविले आहे. त्यामुळे आम्ही सर्व मुस्लिम बांधव बांगलादेशमध्ये झालेल्या हिंदू बांधवांवरील अत्याचाराचा जाहिर निषेध करत आहोत. भारत सरकारने या घटनेची गांभीर्याने दखल घेउन बांगदादेश सरकारला तेथील हिंदू बांधवांवर होणारा अत्याचार थांबविण्यास भाग पाडावे अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर डॉ. सादीक राजे, डॉ. मुदस्सीर सययद, इम्रान तांबोळी, अकिल सययद, समीज राजे, सनवर शेख, असिर राजे, मोबीन तांबोळी, मुजाहिद सययद, शकील सययद, मतिन सययद, साजिद शेख, समीर शेख, सलमान शेख, रेहान शेख, वसीम राजे, अययाज राजे, अफराज राजे, नुरमोहम्मद कुरेशी, अन्वर शेख, अन्वर मोमीन, सुलतान शेख, अजिम शेख यांच्या सहया आहेत.

# चांभुर्डी-उख्खलगांव शिवरस्ता अखेर खुला!

## शेतकऱ्यांकडून आनंद व्यक्त

सुपा : प्रतिनिधी

**गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला चांभुर्डी-उख्खलगांव हा शिवरस्ता अनेक वर्षांच्या संघर्षानंतर महसुल विभागाच्या वतीने खुला करण्यात आला असून रस्ता खुला झाल्याने शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला.**



हा रस्ता खुला झाल्याने शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची ने आण आता सुलभ होणार आहे. शेतकरी बाधवांच्या दळणवळणाचा प्रश्न माग लागला आहे. श्रीगोंद्याच्या तहसिलदार डॉ. क्षितीजा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवपानंदर रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, दादासाहेब जंगले यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र नागवडे, संतोष ढगे, परेश वाबळे, रामचंद्र अडसरे, सुनील गायकवाड, जालिंदर कातोरे, गुरू गायकवाड, राजेंद्र उंडे, बापूराव जंगले यांच्या प्रयत्नानंतर चांभुर्डी व उख्खलगांव हद्दीतील मोजणी करण्यात आली. हद्दी खुणा निश्चित करून ३३ रुंद फुट दोन किलोमीटरचा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला.
मंडलाधिकारी गिरीष गायकवाड,तलाठी भाऊसाहेब सरोदे यांनी या कामी मोलाची कामगिरी केली.

### इतर गावांनीही प्रेरणा घ्यावी

चांभुर्डी-उख्खलगांव शिवरस्ता खुला झाल्याने इतर गावांनाही त्यातून प्रेरणा मिळेल. शेतीसाठी रस्ते खुले होऊन शेतकऱ्यांचा दळणवळणचा प्रश्न माग लागेल. कष्टाने पिकविलेला शेतमाल बाजारात नेता येईल आणि समृध्द महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल.नागरीकांनी अधिकाऱ्यांना साथ देत शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांसाठी सुरू असलेला संघर्ष थांबविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

शरद पवळे
शेतपानंद रस्ता चळवळीचे प्रणेते

### नाशिक येथे पेरू वाटप आंदोलन

शेत तिथे रस्ता मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी शिवपानंद शेतरस्ता चळवळ सुरू असून शासन निर्णयासह न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याची मागणी करण्यात येउनही न्याय मिळत नसल्याने १६ डिसेंबर रोजी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयापुढे पेरू वाटप आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधण्यात येणार असल्याचे शरद पवळे यांनी सांगितले.

# पुतळयाची विटंबना करणारास कठोर शासन करा

## पारनेर तालुक्यातील आंबेडकरी समाजाची मागणी

पारनेर : प्रतिनिधी

**परभणी शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व त्यासमोर ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी पारनेर तालुक्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली.**




यासंदर्भात तहसिदार गायत्री सैंदाणे यांना निवेदन सादर करण्यात आले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, या घटनेचा पारनेर शहर तसेच तालुक्यातील आंबेडकरी समाजाच्या वतीने व पक्ष संघटनांच्या वतीने निषेध करण्यात येत आहे. आपला भारत देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानानुसार चालत असून या देशात जिथे संविधानाचे पुजन केले जाते त्याच महाराष्ट्रात संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या आरोपीविरोधात राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. परभणी येथे घडलेल्या प्रकाराबाबत आरोपीला अटक करण्यात आली असून त्यामागी खऱ्या सुत्रधाराचा शोध घेउन त्यालाही अटक करण्यात यावी, त्याच्यावरही राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर नगरसेविका हिमानी नगरे, अमित जाधव, बाळासाहेब नगरे, किरण सोनवणे, निखिल गायकवाड, महेश उमाप, मनोज शिंदे, विनोद गायकवाड, श्रीनिवास शिंदे, मधुकर साळवे, संपत पवार, किरण सोनवणे, अक्षय जाधव, अजय जगताप, रामदास अल्हाट, संपतराव नगरे, प्रकाश नगरे, अनिल सातपुते, ईश्वर भोसले, नीलेश गायकवाड, अजय सोनवणे, स्वप्निल आंबेटकर, रमेश गायकवाडय, स्वप्निल गायकवाड, मनोज सोनवणे, सुभाष नगरे, सुनील शिंदे, श्याम पंडीत, गणेश धोत्रे, रोहित नगरे, संकेत बोरूडे, निखिल लव्हांडे, गणेश सोनवणे, उदय उमाप, नितीन पाडळे, जनार्दन सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जीवनात आईचे महत्त्व अनन्यसाधारण

## सचिन महाराज बेंडे यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**आई ही आपल्या जीवनातील अनमोल रत्न असून आजच्या युवकांनी आई वडीलांची सेवा करीत ईश्वरी सेवेचे पुण्यकर्म करण्याचे काम करावे असे आवाहन सचिन महाराज बेंडे यांनी व्यक्त केले.**



ताईबाई गणपत वराळ या मातोश्रींच्या पुण्यस्मरण कार्यक्रमात ते बोलत होते. वराळ कुटुंबाने आईची सेवा करीत ईश्वरी सेवेचे पुण्यकर्म केले असून आई वडील हे आपले दैवत आहे जो हा दैवत विसरला तो कायमचा संपला हा इतिहास आहे. हे विसरुन जमणार नाही यासाठी आई वडील यांना आपले दैवत मानून कार्यरत राहा हीच आपली धर्म संस्कृती आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी या हिंदूस्थानची सेवा करताना ही धरणीमाता म्हणजे माझी आई आहे.

जिजाऊंच्या पोटी जन्म घेताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी ही हिंदूस्थान भुमी मुघलांच्या हातून स्वातंत्र्य करताना जिवाचे रान केले हजारो मावळया देशासाठी योगदान दिले. या भुमिला आईचे महत्त्व दिले म्हणून आज हिंदू संस्कृती जिवंत आहे तोच इतिहास आपण कधीच विसरता कामा नये आईने आपल्यासाठी आयुष्यभर योगदान दिले यासाठी आई वडील हे आपले दैवत मानीत कार्यरत राहा आपल्याला आयुष्यभर काहीच कमी पडणार नाही असा विश्वास बेंडे महाराज यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी निघोज व परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर तसेच आजी माजी सैनिक व अधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सोमनाथ महाराज वरखडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, आनंदा वराळ , लक्ष्मीबाई वराळ, सुनंदा पिंपरकर, मच्छिंद्र पिंपरकर, मेजर विकास वराळ, पैलवान सुभाष वराळ आदींनी आभार मानले.

### ...समाजप्रबोधनाचा त्यांनाच अधिकार !

जे महाराज आई वडील यांना सांभाळतात त्यांचेच किर्तन प्रवचन ठेवा तेच महाराज समाजात अमुलाग्र बदल करु शकतात तेच आई वडील यांना सांभाळतात तेच समाजप्रबोधन करण्याचा त्यांना खरा अधिकार आहे.

सचिन महाराज बेंडे

# निघोजला दि .१३ पासून उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धा

## माऊलीशेठ वरखडे मित्रपरिवाराच्या वतीने आयोजन

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील निघोजचे उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊलीशेठ वरखडे मित्र परिवार आयोजीत भव्य अंडर आर्म नाईट प्रिमिअर लिग " उपसरपंच चषक " क्रिकेट स्पर्धा शुक्रवार दि . १३ ते रविवार दि . १५ या ३ दिवस संपन्न होणार असल्याची माहिती उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊलीशेठ वरखडे मित्र परिवाराने दिली आहे .**



उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धेचे ५ वे वर्षे असून निघोज येथील वडनेर रोड वरील, वरखडे वस्ती मैदानावर या क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . प्रथम क्रमांक १५ , ५५५ रुपये (सचिन पाटील वराळ, मनोज भाऊ मुंगसे (सरपंच ) पृथ्वीराज खोपटे,)व्दितीय क्रमांक १३ , ३३३ सुनील पवार साहेब मुंबे बँक, गणेश कटारिया (सुनीती ज्वेलर्स )राहुल शेठ थोरात, (युवा नेते) तृतीय क्रमांक ११ ,१११ अर्जुन लामखडे (गाडा मालक ) खंडूशेठ घुले (कांदा मालक ) असे बक्षीसे ठेवण्यात आली आहेत , तर मैदान , सन्मान चिन्ह , दादा फायटर्स , बॉल / स्टम्प , बॅट , सरपंच इलेव्हन अळकुटी , शिवबा फायटर्स , सरपंच सचिन वराळ , शिव शंभो वॉरिअर्स , जाहिरात यासाठी विविध दानशूर व्यक्तींनी सौजन्य दिले आहे.

तर रविवार दि . १५ रोजी ८ वाजता या स्पर्धेचे खास आकर्षण असलेल्या सायली पाटील यांचा जल्लोष म्युझिकल ऑर्केस्ट्रा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .

# कमाडंट रणजीतचे यश प्रेरणादायी

## चंद्रकांत चेडे यांचे प्रतिपादन

पारनेर : प्रतिनिधी

**भारत सरकारच्या तटरक्षक दलामध्ये असिस्टंट कमांडटपदी निवड झालेल्या रणजीत पदमाकर भालेकर याचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून रणजीतकडून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनी यशला गवसणी घालण्याचे आवाहन किसान बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी केले.**



भारत सरकारच्या तटरक्षक दलामध्ये असिस्टंट कमांडंट म्हणून नुकतीच निवड झाल्याबददल रणीजीत भालेकर याचा किसान परिवाराच्या वतीने ह्रदय सत्कार करण्यात आला त्यावेळी चेडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना चेडे म्हणाले, रणजीत हा लहानपणापसुनच जिद्दी होता. त्यामुळेच त्याने हे उत्तुंग यश संपादन केले आहे. एखादी गोष्ट करायचा निश्चय केल्यावर पुन्हा मागे वळून न पाहता ती गोष्ट तडीस नेण्याचा त्याचा स्वभाव आहे. असिस्टंट कमांडंट पदाला गवसणी घालण्याचे ध्येय ठेऊन १३ वेळा अपयश येऊनही खचून न जाता त्याने हे यश संपादन केले आहे ही बाब खरोखरच गौरवास्पद आहे. किसानच्या विद्यार्थ्यांनी रणजीतपासून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून मोठे अधिकारी होण्याचे ध्येय ठेवण्याचे आवाहन चेडे यांनी केले.

यावेळी प्राचार्य मनोज राठोर, सोनिया गुंजाळ, अंकिता भालेकर, शिक्षक, विद्यार्थी मोठया संख्येने उपिस्थत होते.

### ध्येय ठेवा, यश निश्चित !

नव्यानेच विवाहबंधनात अडकलेला रणजीत हा त्याची पत्नी अंकिता हिच्यासह या सत्कार सोहळयासाठी उपस्थित होता. किसान शैक्षणिक संस्थेच्या वतीने करण्यात आलेल्या सन्मानाबददल कृतज्ञता व्यक्त करतानाच भालेकर आणि चेडे परिवाराचे स्नेहबंध असल्याचे त्याने कृतज्ञतापुर्वक नमुद केले. लहानपणापासून चंद्रकांत चेडे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगतानाच विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून तयारी केल्यास यश हमखास मिळेल असा विश्वास रणजीत याने व्यक्त केला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com